Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ५, अंक ४५ ] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर ७-१३, २०१९/कार्तिक १६-२२, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक- शासकीय अधिसूचना** : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना** : नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-४ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-२३ |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३९२.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक प्र.अ.-भु.सं.-अ.का.-कावी-६१९-२०१९.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसूचना क्रमांक ८२२-१८, दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढलेली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन करण्याची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी एस. एस. अपार, उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अचलपूर यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ३७-४७-२००७-२००८, गाव-बोराळा, तालुका-चांदूरबाजार, जिल्हा अमरावती.

| अ. क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ४०/१अ | ० २६६ |
| २ | ४१/१ | ० ११२ |
| ३ | ४१/१अ | ० ०२६ |
| ४ | ४२/२ | ० ०७३ |
| ५ | ४२/३ | ० १८६ |
| ६ | ४३/२ | ० ०५६ |
| ७ | ४५/१ | ० ०१० |
| ८ | ४५/१क | ० ०१० |
| ९ | ४९/३ | ० ०५५ |
| १० | ५०/१ | ० ०४४ |
| ११ | ५१/१ | ० ०२८ |
| १२ | ५१/२ | ० ०३५ |
| १३ | ५४/३ | ० ०८० |
| १४ | ५४/२ | ० ०८१ |
| १५ | ५५/१अ | ० ०७३ |
| १६ | ५५/१ब | ० ०३७ |
| १७ | ५५/२ | ० ०९५ |
| १८ | ५६ | ० १९४ |
| १९ | ५७ | ० १०३ |
| २० | ५८/१ | ० ००८ |
| २१ | ५९/१ | ० १२० |
| | एकूण क्षेत्र . . | १ ६९२ |

## अनुसूची-दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | बोराळा ते खराळा रस्त्याचे कामाकरीता (रस्ता रुंदीकरण) |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | बोराळा ते खराळा रस्त्याचे कामाकरीता. |
| समाजाला मिळणारे लाभ | :— | बोराळा ते खराळा या रस्त्याचे कामाकरीता लोकांना वहिवाट करीता सुविधा ग्रामिण पायाभुत सुविधांचा लाभ होईल. |

## अनुसूची-तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

– निरंक –

## अनुसूची-चार

### पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

– निरंक –

अमरावती :
दिनांक २७ सप्टेंबर २०१९.

**शैलेश नवाल,**
जिल्हाधिकारी, अमरावती.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १३९३.

**संदर्भ :—**विशेष भूसंपादन अधिकारी कंत्राटी क्र. २ जिगांव प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यांचे पत्र क्र. कावि/अका-कं.क्र. २-३५६-२०१९, दिनांक १४-१०-२०१९.

## आदेश

क्रमांक कावि-कक्ष ७:२-प्रअभूसं-न.क्र.१०२-कावि-२९७२-२०१९.—

ज्याअर्थी, विशेष भूसंपादन अधिकारी कंत्राटी क्र. २, जिगांव प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यांनी त्यांच्या संदर्भीय पत्रानुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक १२-२००८-०९, मौजे मानेगांव (बुडीत क्षेत्र), ता. जळगाव जामोद मध्ये प्रारुप निवाड्यास ६ महिन्यांची मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर प्रकरणात फळझाडे मुल्यांकन हे विशेष चौकशी समिती यांच्या विचाराधीन आहे. तसेच शेतीतील मालमत्ताचे मुल्यांकन देखील यंत्रणेकडून आजपर्यंत प्राप्त झालेले नाही. त्यांनी दिनांक ०४-१०-२०१९ रोजीच्या पत्रामध्ये यावर्षी सतत पाऊस असल्यामुळे शेतावर मोजणी करणे शक्य झाले नाही. तसेच यापुढे मोजणी करणे, अंदाजपत्रक तयार करणे, तपासणी करणे व त्यास मान्यता घेणे याबाबीसाठी कालावधी आवश्यक आहे. त्यामुळे मुदतवाढ घेणे गरजेचे आहे असे नमूद करून प्रकरणात प्रारूप निवाड्यासाठी आवश्यक ती मुदतवाढ घेण्याबाबत विनंती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, विशेष भूसंपादन अधिकारी, कंत्राटी-क्र. २, जिगाव प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यांनी यंत्रणेकडून शेतीवरील मालमत्ता मुल्यांकन प्राप्त करणे व तद्नंतर भूसंपादन अधिकारी यांचे स्तरावरील कार्यवाहीसाठी ६ महिन्यांचा कालावधी लागू शकतो त्यामुळे यंत्रणेने विनंती केल्यानुसार व आवश्यकता असल्याने प्रकरणात दिनांक २१ मे २०२० पर्यंत पुढील ६ महिन्यांची प्रारूप निवाड्याकरीता मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती केली आहे;

त्याअर्थी, भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २५ मध्ये जिल्हाधिकारी, कलम १९ अन्वये घोषणा प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल.

परंतु, त्यांचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल.

परंतु आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय लेखी स्वरूपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल. अशी तरतूद आहे.

तरी भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे नियम २५ नुसार भूसंपादन प्रकरण क्र. १२-२००८-०९, मौजे मानेगांव (बुडीत क्षेत्र), ता. जळगाव जामोद, जि. बुलडाणा या प्रकरणात प्रारूपनिवाडा करण्यास ०६ (सहा) महिन्यांची मुदतवाढ देण्यांत येत आहे.

बुलडाणा : **डॉ. निरुपमा डांगे,**

दिनांक १६ ऑक्टोबर २०१९. जिल्हाधिकारी, बुलडाणा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSLE, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSLE.